क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१००

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १३ जून, २००१.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १७ मे,२००१ (गुरुवार) रोजी झालेल्या १०० व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवीत आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

सचिव
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य,

निमंत्रित :
शासनाचे प्रधान सचिव (नवि-२)
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्रा.,

प्राधिकरणाचे अधिकारी

Uaa2 MTCFORM

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## १००व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : १७ मे, २००१ (गुरुवार)

वेळ : सकाळी ११.०० वाजता

सभास्थान : समिती कक्ष, ६वा मजला, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

उपस्थित सदस्य :

| | |
|---|---|
| श्री.विलासराव देशमुख<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| डॉ.सय्यद अहमद<br>गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| श्री.सुनिल तटकरे<br>नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री.वसंत डावखरे<br>उप सभापती,<br>विधान परिषद | सदस्य |
| श्री.प्रद्युमन उ.महेता<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री.रा.ता.कदम<br>नगरसेवक<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.विजय दारुवाले<br>नगरसेवक<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.व्ही.रंगनाथन<br>शासनाचे मुख्य सचिव<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |

| | |
|---|---|
| श्री.क.चं.श्रीवास्तव<br>महापालिका आयुक्त<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.अवधेश प्रसाद सिन्हा<br>शासनाचे प्रधान सचिव (१)<br>नगर विकास विभाग | सदस्य |
| श्री.रवि भूषण बुध्दिराजा<br>शासनाचे प्रधान सचिव<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| श्री. अनिलकुमार लखिना<br>व्यवस्थापकीय संचालक<br>सिडको | सदस्य |
| श्री.अजित वर्टी<br>महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

**निमंत्रित :**

श्री.रामानंद तिवारी
शासनाचे प्रधान सचिव(२)
नगर विकास विभाग

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष, प्राधिकरण यांनी डॉ.सय्यद अहमद, गृहनिर्माण मंत्री यांचे प्राधिकरणाचे पदसिध्द सदस्य म्हणून प्रथमच उपस्थित रहात असल्याने त्यांचे स्वागत केले.

तसेच मा. अध्यक्ष यांनी माजी गृहनिर्माण मंत्री, श्री.रोहिदास पाटील व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे माजी अध्यक्ष श्री. चंद्रकांत वाडकर यांनी प्राधिकरणाचे सदस्य म्हणून केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर प्राधिकरणाने श्री.सुधाकरराव नाईक, माजी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, यांच्या दिनांक १०-०५-२००१ रोजी झालेल्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त केला व सदस्यांनी एक मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहिली. तसेच प्राधिकरणाने श्री.नाईक यांच्या निधनाबद्दलच्या शोक संदेशास (जोडपत्र) मंजूरी दिली.

त्यानंतर विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

<u>बाब क्रमांक १</u> : <u>दिनांक १७ फेब्रुवारी,२००१ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (९९व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.</u>

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

<u>बाब क्रमांक २</u> : <u>दिनांक १७ फेब्रुवारी,२००१ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (९९व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.</u>

कार्यवृत्तावरील अहवालाच्या वेळी खालील बाब टिप्पण्यांवर चर्चा झाली व निर्णय घेण्यात आले :–

(१) बाब क्रमांक ५ : बँक ऑफ बडोदा या संस्थेने वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमधील निवासी भूखंड कर्मचारी निवासस्थानाच्या वापराकरिता देण्यात आलेल्या भूखंडाच्या अधिमूल्याची ५० टक्के रक्कम भरण्यास झालेला दोन दिवसाचा विलंब प्राधिकरणाने क्षमापित केला.

(२). बाब क्रमांक १० : इंडियन न्युजपेपर सोसायटीला कार्यालयीन संकुल उभारण्याकरिता वांद्रे-कुर्ला संकुलात भूखंड देण्यात आला होता. सदरहू भूखंडाच्या अधिमूल्याच्या रकमेचा पहिला हप्ता दिनांक १३-०४-२००१ पूर्वी भरणे आवश्यक होते. परंतु संस्थेने अधिमूल्याचा पहिला हप्ता भरलेला नाही. सदरहू संस्थेस

अधिमूल्याचा पहिला हप्ता भरण्यास आणखी एक महिन्याची मुदतवाढ दिनांक १८ जून,२००१ पर्यंत देण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली.

(३) बाब क्रं.३ व १९: पश्चिम उपनगरातील फळे व भाजीपाला व्यापा-यांसाठी छोटया बाजारपेठा निर्माण करण्याबाबतचे व उल्हासनगर, अंबरनाथ व कुळगांव-बदलापूर परिसराच्या प्रारुप विकास योजनेसाठी गठीत करावयाच्या नियोजन समिती संबंधीची कार्यवाही पूर्ण झाल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्रमांक ३ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयूटीपी) निधी पुरवटयाची व्यवस्था.**

प्रकल्प संचालक, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प यांनी "एमयूटीपी" मध्ये अंतर्भूत केलेले प्रकल्प, त्यांचा अंदाजित खर्च, जागतिक बँकेकडून येणारे अपेक्षित कर्ज व त्या त्या अंमलबजावणी संस्थांनी करावयाचा प्रतिभाग खर्च या संदर्भात माहिती दिली. महाराष्ट्र शासन व रेल्वे मंत्रालय यांच्यात झालेल्या करारानुसार रेल्वे घटकांवर होणा-या खर्चाच्या ५० टक्के भाग महाराष्ट्र शासनाने सोसावयाचा आहे. तो विचारात घेऊन राज्य शासनाला सुमारे रुपये ७४५ कोटी प्रतिभाग निधी म्हणून उपलब्ध करुन द्यावे लागतील व ही रक्कम प्रकल्पाचा सुधारीत खर्च उपलब्ध झाल्यानंतर रुपये ९०० कोटी पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. हा निधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उपलब्ध करुन द्यावा अशी शिफारस कार्यकारी समितीने त्यांच्या १८३व्या बैठकीत केली आहे. प्रकल्प संचालक यांनी असेही नमूद केले की, जागतिक बँकेकडून

घ्यावयाच्या कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी प्राधिकरण स्विकारु शकत नाही व ती राज्य शासनाने घ्यावी असे कार्यकारी समितीने सुचविले आहे.

प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, वरील आशयाचा प्रस्ताव लवकरच महाराष्ट्र मंत्रीमंडळाच्या संमतीसाठी सादर करण्यात येणार आहे.

मा.मुख्यमंत्री आणि अध्यक्ष, प्राधिकरण यांनी अशी विचारणा केली की रेल्वे मंत्रालय व केंद्र शासनाचा वित्त विभाग यांच्यातील मतभेद दूर झाले कां? त्यावर महानगर आयुक्त यांनी माहिती दिली की, दोन्ही विभाग आपापल्या भूमिकेवर ठाम असल्यामुळे तो प्रश्न काही अजून सुटलेला नाही व त्यामुळे जागतिक बँकेकडून कर्ज मिळण्यास विलंब होत आहे. त्यावर मा.मुख्यमंत्री यांनी असे सुचविले की, याबद्दल मा.पंतप्रधान यांना पत्र पाठवून त्यांच्या भेटीची वेळ मागवून घ्यावी तसेच त्या बैठकीसाठी महाराष्ट्रातील व विशेषतः मुंबईमधून निवडून गेलेले केंद्रीय मंत्री व खासदार यांनाही खास निमंत्रित करावे.

विषयाचे निमित्ताने रेल्वेच्या जागेवर अतिक्रमण केलेल्या व मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाने बाधित होणा-या झोपडयांच्या पुनर्वसनाबाबत चर्चा झाली. या पुनर्वसनाची जबाबदारी फक्त राज्य शासनावर ढकलण्याच्या रेल्वेच्या धोरणाला आक्षेप घेण्यात आला. तसेच जर प्रकल्प जागतिक बँकेकडे सादर होण्यास विलंब होणार असेल तर आपण पुनर्वसनावर केलेल्या खर्चाची परिपूर्ती रेल्वेकडून करण्याची मागणी करावी, असे ठरले.

मा.मुख्यमंत्री यांनी सुचविलेल्या विचारांच्या अधिन राहून प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला:—

ठराव क्रमांक ८९६ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयूटीपी) साठी, बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे, राज्य शासनाच्या वाटयाचा प्रतिभाग निधी

म्हणून सुमारे रुपये ७४५ कोटींची रक्कम, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उपलब्ध करुन देण्यास प्राधिकरण तत्वतः मान्यता देत आहे व हयासंबंधीच्या अटी व शर्ती शासनाच्या संमतीने ठरविण्यात याव्यात. मात्र बाब टिप्पणीत उल्लेख केल्याप्रमाणे, जागतिक बँकेच्या कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी राज्य शासनाची राहील. त्याचप्रमाणे, एमयूटीपी सबंधीत पुनर्वसनाचा संपूर्ण खर्च प्रथमतः मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करण्यास व बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे त्याची वसूली करण्यास प्राधिकरण तत्वतः मान्यता देत आहे."

**बाब क्रमांक ४ :** **मुंबई नागरी परिवहन प्रकल्पामुळे बाधीत होणा-या कुटुंबांचे पुनर्वसन करण्यासाठी मौजे अणिक ता.कुर्लामधील भूमापन क्र.१९२ (पार्ट), सी.टी.एस.क्र.३२० (बी) शासनाकडून मिळवून घेण्यासंबंधीत प्रस्ताव.**

प्रकल्प संचालक, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प यांनी असा खुलासा केला की, मुंबई नागरी परिवहन प्रकल्पामध्ये सुमारे १९,२०० कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. म्हाडाकडून यासाठी सुमारे ४००० गाळे विकत घेतले आहेत. मुंबई महानगरपालिकेने सुमारे २.५ हेक्टर क्षेत्रफळाच्या दोन जमिनी पुनर्वसनासाठी उपलब्ध केल्या आहेत. शिवाय सुमारे दोन हेक्टर खाजगी जमीन टीडीआर च्या मोबदल्यात मिळणार आहेत. या ४.५ हेक्टर जमिनीत अंदाजे ३००० कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात येईल व उरलेल्या १२००० कुटुंबांचे पुनर्वसन दोन पर्यायामध्ये करण्याचा विचार आहे. त्यापैकी खाजगी विकासकांकडून हस्तांतरणीय विकास हक्क व काही पैशांच्या मोबदल्यात सुमारे ५००० सदनिका बांधून घेण्यात येतील व उरलेल्या सुमारे ७००० कुटुंबांचे पुनर्वसनासाठी १० ते १२ हेक्टर जमिनींची आवश्यकता आहे. यासाठी जिल्हाधिकारी मुंबई शहर व उपनगरे हयांना तीन ठिकाणच्या शासकीय जागा देण्याबाबत विनंती केली होती. त्यापैकी अणिक गावठाणातील सिटीएस क्रमांक २३० (बी) येथील सुमारे ८ हेक्टर

जमीन मोकळी असून सध्या ती विकास आराखडयाप्रमाणे "ट्रक टर्मिनससाठी " राखून ठेवली आहे. परंतु या जागेच्या जवळच वडाळा येथे प्राधिकरणाने ८० हेक्टर जागा ट्रक टर्मिनलसाठी राखून ठेवली असून त्याचा टप्पा-१ चे (२५ हेक्टर) काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे नव्या ट्रक टर्मिनलची आवश्यकता राहणार नाही असे वाटते.

याबाबतीत प्राधिकरणाने असा निर्णय घेतला की, सदर भूखंड प्राधिकरणाच्या नावाने करुन देण्याबाबत महसूल व वन विभागाला शिफारस करावी. तसेच बृहन्मुंबईच्या विकास आराखडयामध्ये योग्य ते फेरबदल करण्याची प्रक्रिया सुरु करण्याबाबत नगर विकास विभागाला शिफारस करण्यात यावी.

**बाब क्रमांक ५ :** **प्रदर्शने, व्यापारी जत्रा, संगीत व सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची मैदाने तात्पुरत्या भाडेपट्टयाने देण्याबाबतचे धोरण.**

वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमध्ये बरीच विकसित जागा उपलब्ध आहे. त्या ठिकाणी अलिकडेच दोन प्रदर्शने यशस्वीरित्या पार पाडली. त्यानंतर अशाच स्वरुपाच्या उपयोगासाठी वाढती मागणी येत आहे. वांद्रे-रिक्लेमेशन येथे अशाच प्रयोजनार्थ म्हाडा आकारत असलेल्या भाडयावर आधारित धोरण प्रस्तावित केल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्रमांक ८९७ :**

" असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ (२) अन्वये प्राप्त झालेल्या व अन्य अधिकारांचा उपयोग करुन प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीच्या परिच्छेद-८ मध्ये शिफारस केल्याप्रमाणे प्राधिकरणाची मैदाने तात्पुरत्या वापरासाठी भाडयाने देण्यासाठी व सुरक्षा अनामत घेण्यास

मान्यता देत आहेत. तसेच, हया धोरणाप्रमाणे प्राधिकरणातर्फे हाती घेतलेल्या मुलभूत सुविधांच्या बांधकामावर किंवा प्राधिकरणाच्या मालमत्तेवर प्रतिकुल परिणाम होणार नाही त्यांची काळजी घेऊन तात्पुरत्या उपयोगासाठी भूखंड देण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहेत. "

<u>बाब क्रमांक ६ :</u> <u>वडाळा भारवाहक तळातील बी-२ इमारतीमधील २ गाळे वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशन यांना भाडे तत्वावर वाटप करणे.</u>

वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशन (WIAA) हया सुस्थापित संस्थेने ट्रक चालकांना प्रशिक्षण देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे व त्यासाठी वडाळा ट्रक टर्मिनल येथे जागेची मागणी केली आहे. हा उपक्रम सार्वजनिक हिताचा असल्याने, प्राधिकरणाची जागा निविदा मागवूनच द्यावी हया नियमात सुट देऊन परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेल्या भाडयाने वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशनला जागा द्यावी असा प्रस्ताव असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्रमांक ८९८ :**

" **असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोटकलम (२) मधील अधिकारांचा व याबाबतीत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारीत १९९७) मधील नियम ४ ला सुट देऊन विशेष बाब म्हणून प्राधिकरण याद्वारे वडाळा भारवाहक तळातील बी-२ इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील एकूण १३९.२६ चौ.मी. परिबध्द क्षेत्र असलेले २ गाळे क्रमांक ११४ व ११५ हे वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशनला

बाब टिप्पणीच्या परिच्छेद ३ मधील अटी व शर्तींच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपावर ५ वर्षासाठी भाडे तत्वावर वाटप करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** या ठरावाची अंमलबजावणी करण्यास हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्रमांक ७ :** **चितळसर मानपाडा येथील गट क्रमांक ४१/१ पैकी व ४१/३ पैकी २९३०० चौ.मी.जागा ठाणे महानगरपालिकेस हस्तांतरीत करणे बाबत.**

महानगर आयुक्त यांनी ठाणे महानगरपालिकेस चितळसर मानपाडा येथील गट क्रमांक ४१/१ पैकी व ४१/३ पैकी २९,३०० चौ.मी.जागा रस्ते सुधार कार्यक्रमांमुळे विस्थापीत होणा-या व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी मिळावी असा ठाणे महानगरपालिकेचा आग्रह होता. त्याप्रमाणे मा.अध्यक्ष यांच्या पूर्वपरवानगीने जमीन हस्तांतरीत करण्यात आलेली आहे असे महानगर आयुक्त यांनी सांगून सदरहू प्रस्तावास कार्योत्तर मंजूरी मिळावी अशी विनंती प्राधिकरणास केली.

त्यानुसार,बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्रमांक ८९९ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमीनीची विल्हेवाट) विनियम १९७७, (सुधारीत १९९७) च्या नियम क्रमांक १५ आणि त्याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर अधिकारांचा वापर करुन प्राधिकरणाच्या मालकीची मौजे चितळसर मानपाडा येथील गट क्रमांक ४१/१ पैकी व ४१/३ पैकी २९,३०० चौ.मी.हया जमीनीचा ताबा प्राधिकरणाने दिनांक १९-०४-२००१ रोजी ठाणे महानगरपालिकेस ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने "विस्थापितांच्या पुनर्वसनासाठी "

नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग ठरविल ती किंमत ठाणे महानगरपालिका प्राधिकरणास देईल या अटीवर देण्याचे प्राधिकरणाचे मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या मान्यतेनुसार केलेल्या कार्यवाहीस प्राधिकरण याद्वारे कार्योत्तर मंजूरी देत आहे."

**बाब क्रमांक ८ :** **महानगर गॅस लिमिटेड यांना चटई क्षेत्र निर्देशांक वाढवून देण्याबाबत.**

महानगर गॅस लिमिटेड यांना प्राधिकरणाने सुमारे १२०० चौ.मी.क्षेत्रफळाचा भूखंड ०.८ चटई क्षेत्र निर्देशांकाने दिला होता. त्या ठिकाणी त्यांच्या इमारतीचे बांधकाम चालू आहे आता अधिक क्षेत्रफळाची गरज भासल्याने महानगर गॅस लिमिटेडने एक मजला म्हणजे २१८.३१ चौ.मी. एवढया वाढीव जागेची मागणी केली आहे व त्यासाठी पूर्वीच्या दराने अधिमूल्य भरण्याची तयारी दर्शविली आहे असे प्रतिपादन करुन महानगर आयुक्त यांनी प्रस्ताव मंजूर करण्याची विनंती केली.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्रमांक ९०० :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** हे प्राधिकरण मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे उपकलम (२) खालील त्यास प्रयोज्य असलेल्या शक्तींचा वापर करुन या बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे महानगर गॅस लिमिटेड यांना २१८.३१ चौ.मी.बांधकामाची एक मजल्याची परवानगी बांधकामाच्या दर चौ.मी.क्षेत्रास रुपये २५०००/- प्रमाणे अधिमूल्य आकारुन मान्यता देत आहे व महानगर आयुक्तांना त्यानुसार पुढील योग्य ती अनुषंगिक कार्यवाही करण्यास प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्रमांक ९ :</u> <u>भारत नगर मधील पत्थर नगर या वसाहतीसाठी शौचकुपे बांधण्यासाठी " जी/एन "ब्लॉकमधील मोकळया जागेचे वाटप करण्या बाबत.</u>

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :—

**ठराव क्रमांक ९०१ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिकेला भारत नगर व वाल्मीकी नगर झोपडपट्टीतील रहिवाशांसाठी सार्वजनिक शौचकुपे बांधण्यासाठी "जीएन" ब्लॉकमधील ३०० चौ.मी.जागा बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्रमांक ३ मधील अटी व शर्तींच्या अधिन राहून हस्तांतरीत करण्यास हे प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे."

<u>बाब क्रमांक १० :</u> <u>वांद्रे-कुर्ला संकुलातील भारतनगर गलीच्छ वस्ती क्षेत्रात सुधारणा करण्याकरिता करण्यात आलेल्या खर्चाच्या बचतीची रक्कम पत्थर नगर येथे वापरण्याबाबत.</u>

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :—

**ठराव क्रमांक ९०२ :**

" असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाचा ठराव क्रमांक ६१० अन्वये मंजूर रकमेतील अपेक्षित बचत रु.७० लक्ष रक्कम भारतनगर लगतच्या पत्थरनगर गलिच्छ वस्तीमध्ये मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी अनुदान म्हणून मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (म्हाडाचा घटक) यांना अदा करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाने आपल्या ठराव क्रमांक ६१० मध्ये अंशत: बदल करुन सदर प्रस्तावात, प्रस्तावित केलेली मुलभूत सुविधांची कामे " डिपॉझिट वर्क"म्हणून सदर कामांकरिता यापूर्वी अदा करण्यात आलेला निधी बृहन्मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) यांना "अनुदान" म्हणून देण्यास मान्यता देण्यात येत आहे."

**बाब क्रमांक ११ : मुंमप्र-वास्तुवारसा संरक्षण संस्था व मुंमप्र-पर्यावरण सुधारणा संस्था यांचे दि.०१-०४-१९९९ ते ३१-०३-२००० या कालावधीचे परीक्षित लेखे व वार्षिक अहवाल.**

महानगर आयुक्तांनी प्रस्तावना केल्यानंतर प्रमुख, नियोजन विभाग यांनी मुं.म.प्र.- वास्तुवारसा संरक्षण संस्था व मुं.म.प्र.- पर्यावरण सुधारणा संस्था यांचे सन १९९९-२००० या वर्षाचे परिक्षित लेखे व वार्षिक अहवाल याबददल सविस्तर माहिती दिली. अध्यक्षांनी मुं.म.प्र.-वास्तुवारसा संरक्षण संस्था व शासनाने बृहन्मुंबईसाठी नियुक्त केलेली वास्तुवारसा संरक्षण समिती (Heritage Conservation Committe) यांच्यात काय फरक आहे अशी विचारणा केली. याबाबत खुलासा करतांना महानगर आयुक्तांनी सांगितले की, वास्तुवारसा संरक्षण समिती ही रेग्युलेटरी कमिटी आहे. मुं.म.प्र.वास्तुवारसा संरक्षण संस्था आपल्या इतर उपक्रमाबरोबरच या समितीला उपयोगी अशा प्रकारचे सर्वेक्षण व अभ्यास करुन वास्तुवारसा इमारतीचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी सुयोग्य मार्गदर्शक तत्वे तयार करते. या आधारे वास्तुवारसा संरक्षण समिती विनियम तयार करण्यासाठी शिफारस करु शकते.

श्री.वसंत डावखरे, सदस्य यांनी विचारलेल्या प्रश्नांला उत्तर देतांना महानगर आयुक्त यांनी खुलासा केला की, या संस्थांचे कार्यक्षेत्र हे केवळ मुंबई पुरते मर्यादित नसून मुंबई महानगर प्रदेशातील इतर भागांसाठी सुध्दा (उदा. ठाणे, कल्याण-डोंबिवली) या संस्थांतर्फे कार्य केले जाते. त्यानंतर, प्राधिकरणाने दोन्ही संस्थेचे सन १९९९-२००० चे परिक्षित लेखे व वार्षिक अहवालाची नोंद घेतली.

**बाब क्रमांक १२: मुंबई महानगर प्रदेशातील क्षेत्रामध्ये ग्रामसुधार योजनेखाली, आर्थिक वर्ष २०००- २००१ साठी अनुक्रमे रायगड व ठाणे जिल्हा परिषदांना अनुदान देणेबाबत.**

महानगर आयुक्तांनी ग्रामसुधार योजनेच्या प्रस्तावासंबंधी माहिती दिल्यानंतर अध्यक्षांनी विचारणा केली की, या योजनांबाबत प्राधिकरणाची भूमिका केवळ अनुदान देण्यापुरतीच मर्यादित आहे की, हे अनुदान ज्या कामासाठी दिले जाते त्या कामांवर प्रत्यक्षात खर्च केला जातो किंवा नाही व योजनेची अंमलबजावणी कशाप्रकारे होते हे पाहणे/तपासणेही आवश्यक आहे. यावर महानगर आयुक्तांनी खुलासा केला की, प्राधिकरण या योजनेच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करते.

मा.राज्यमंत्री, नगर विकास यांनी रायगड जिल्हयाच्या योजनांना हरकत घेतांना असे सांगितले की, या योजनांचे प्रस्ताव करतांना त्यांनी सुचविलेल्या योजना लक्षात घेण्यात आलेल्या नाहीत. चर्चेअंती असे ठरले की, रायगड जिल्हयाच्या पाच योजनांबाबत जिल्हा परिषदेस मा.राज्यमंत्री, नगर विकास यांनी सुचविलेल्या योजना लक्षात घेऊन पुनर्विचार करण्यास सांगावे आणि सुधारीत प्रस्ताव प्राधिकरणापुढे ठेवावा. प्राधिकरणाने त्यानंतर ठाणे जिल्हयातील रु.३२.२५ लाख खर्चाच्या १० ग्रामीण सुधार योजनांना मान्यता दिली व खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्रमांक ९०३ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्रमांक ४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्राम सुधार योजने अंतर्गत ठाणे जिल्हा परिषदेस रु. ३२,२५,७७०/- इतक्या खर्चाच्या परिशिष्ट २ मध्ये नमूद केलेल्या ग्रामसुधार योजनेसाठी मुं.म.प्र.वि.प्रा. अधिनियम, १९७४ चे कलम २१ (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन अनुदान देण्यास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी प्रदान करीत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या योजनांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्रमांक १३:</u> <u>घारापूरी (एलिफंटा) बेटाचा, विकास नियंत्रित करण्यासाठी मुं.म.प्र.वि.प्रा.अधिनियम १९७४ च्या कलम १३ अतंर्गत अधिसूचना काढणेबाबत.</u>

महानगर आयुक्तांनी प्रस्तावासंबंधी माहिती दिल्यानंतर मा.अध्यक्षांनी विचारणा केली की, प्राधिकरण प्रस्तावित अधिसूचनेप्रमाणे या बेटावर केवळ बंधने घालणार आहे की, या बेटावरील मुलभूत समस्या जसे, पाणी व वीज पुरवठा या बाबतीत लक्ष घालणार आहेत. मा.अध्यक्षांनी पुढे असे सांगितले की, या बेटावर झालेल्या एका समारंभात त्यांनी पाणी व वीजेची समस्या लवकरात लवकर दूर करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. या बेटावर मोठया प्रमाणात पर्यटक येत असतात. पर्यटकांना मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी मोठया प्रमाणावर भांडवली खर्च करणे स्थानिक ग्रामपंचायतीला शक्य नाही. हे लक्षात घेऊन प्राधिकरणाने व सिडकोने मुलभूत सुविधा देण्याची जबाबदारी घेणे आवश्यक आहे. प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी घारापुरी येथे पाण्याचे व वीजेच्या मुलभूत सुविधेचा दर्जा व क्षमतेमध्ये वाढ करण्याकरिता भांडवली स्वरुपाची मदत प्राधिकरणाने करावी असे सुचविले.

महानगर आयुक्तांनी पाणी पुरवठा व वीज पुरवठा या बाबत विस्तृत माहिती देतांना सांगितले की, या बेटावर अस्तित्वात असलेल्या चार विहिरीतील गाळ काढून त्या स्वच्छ करणे व नविन विहिरी खोदणे आवश्यक आहे. यामुळे पाणी पुरवठयात काही प्रमाणात वाढ होऊ शकेल. तथापि, पर्यटकांसाठी पुरेसा पाणी पुरवठा करण्यासाठी अस्तित्वातील धरणाच्या दुरुस्तीचे काम करणे आवश्यक आहे. हे काम कशा प्रकारे करावे याबाबत पाटबंधारे विभागाचा सल्ला घ्यावा लागेल.

महानगर आयुक्तांनी पुढे सांगितले की, या बेटाला कायमचा विज पुरवठा करण्यासंबंधी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ हे उदासीन आहे. तसेच सौर उर्जा व पवन उर्जा वापरुन वीज पुरवठा करणेही फारसे किफायतशीर आहे असे वाटत नाही. त्यामुळे सद्या जनरेटर मार्फत होणारा वीज पुरवठा पुन्हा चालू करण्याखेरीज पर्याय नाही. प्राधिकरणाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला याबाबत वित्तिय सहाय्य देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. पण महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळसुध्दा विद्युत पुरवठयाची दिर्घकालीन जबाबदारी घेण्यास तयार नाही. महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, घारापूरीचे सरपंच यांनी व स्थानिक रहिवाशांनी असे आश्वासन दिले की, वीज पुरवठा नियमितपणे उपलब्ध करुन दिल्यास महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या विजेच्या दराने आकारणी केल्यास पैसे भरण्याची त्यांची तयारी आहे.

महानगर आयुक्तांनी पुढे असेही सांगितले की, या बेटावरील घनकचरा एकदा संपूर्ण साफ करण्यासाठी लागणारा खर्च प्राधिकरणातर्फे देण्याची तयारी दर्शविली आहे परंतु हे काम कोणी करावे यासंबंधी ग्रामपंचायत, इंटॅक व स्थानिक प्रतिनिधी यांच्यात एकमत होत नसल्यामुळे पुढे प्रगती होऊ शकलेली नाही.

व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी पाणी पुरवठा सुधारण्यासाठी सिडको सद्या मदत करीत असल्याचे सांगितले. ते पुढे म्हणाले की, बेटावरील चार अस्तित्वातील विहिरीतील गाळ काढून त्या स्वच्छ करण्याचे काम सिडकोने केलेले आहे व दोन नव्या विहिरी खोदण्यासाठी निविदाही मागविण्यात आलेल्या आहेत. त्यांनी वीज पुरवठयात सुधारणा व घन कचरा व्यवस्थापन यातही मदत करण्याची सिडकोची तयारी असल्याचे सांगितले. परंतु त्यासाठी लागणारा भांडवली खर्च व पाच वर्षापर्यंत चालविणे व देखभालीचा (Operations & Maintenance) खर्च प्राधिकरणाने देणे आवश्यक आहे. मा.अध्यक्षांनी सिडको जर ही जबाबदारी स्विकारण्यास तयार असेल तर त्यांना जरुर मदत करावी असे सुचविले. त्यांनी पुढे असेही सुचविले की, या संबंधी दीर्घकालीन व्यवस्था करण्यासाठी ग्रामीण विकास विभागाकडून जिल्हापरिषदेस मिळणा-या अनुदान

निधीतील काही रक्कम या कामासाठी वापरण्यात यावी. यावर महानगर आयुक्तांनी अशा प्रकारचा देखभालीचा (Operations & Maintenance) खर्च प्रथमतः फक्त एक वर्षासाठी मर्यादित ठेवावा व त्यामुदतीत सिडकोने ग्रामस्थाकडून अथवा सोईचा वापर करणा-याकडून या खर्चाची भरपाई कशी करता येईल ते ठरवावे.

घारापूरी बेटाचे योग्य व्यवस्थापन व मुलभूत सुविधांची सोय होण्याच्या दृष्टीने या बेटाचा बृहन्मुंबईत समावेश करावा असे मुख्य सचिवांनी सुचविले. यावर मा.अध्यक्ष म्हणाले की, अशा प्रकारचा प्रस्ताव स्थानिक लोकांना कदाचित मान्य होणार नाही त्यामुळे सिडकोने हे व्यवस्थापन करण्यामध्ये पुढाकार घ्यावा. त्यांना तसे अधिकार देण्यात यावेत व त्यासाठी प्राधिकरणाने सिडकोच्या कामाला आवश्यक ते वित्तिय सहाय्य करावे.

त्यांनतर, प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्रमांक ९०४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** घारापुरी बेटाचे नियोजन व विकास नियंत्रित करण्यासाठी वर नमुद केलेल्या बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र. ४ मधील प्रस्तावानुसार मुं.म.प्र.वि.प्रा. अधिनियम १९७४ च्या कलम १३(१) द्वारे प्रदान केलेले व या सबंधी सहाय्यभूत सर्व अधिकारांचा वापर करुन बाब टिप्पणीच्या सहपत्रातील प्रारुपानुसार एक अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्राद्वारे काढण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील अधिसूचना कलम ७(अ) अंतर्गत अधिकारांचा वापर करुन साक्षांकित करुन महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रकाशित करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्रमांक १४:** **वांद्रे-कुर्ला संकुलातील प्राधिकरणाच्या मालकीच्या जमिनीच्या भाडेपट्टादारांनी इमारत बांधकाम पूर्ण करण्यासाठी लावलेल्या विलंबासंदर्भात योजावयाच्या धोरणाबाबत.**

महानगर आयुक्तांनी हया विषयाची पार्श्वभूमी विषद केली सन १९९४ पर्यत प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुलात बरेच भूखंड त्यावेळच्या बाजार भावाने संपूर्ण अधिमूल्य घेऊन दिले आहेत. परंतु त्यानंतर इमारतींच्या बाजार भावात लक्षणीय घट आल्याने ब-याच भाडेपट्टादारांनी बांधकामे वेगाने पूर्ण केली नाहीत. त्यावेळच्या नियमाप्रमाणे तीन वर्षात बांधकाम पूर्ण करणे अपेक्षित होते. परंतु भाडेपट्टादारांच्या अडचणी लक्षात घेऊन १९९८ मध्ये त्यांना मुदतवाढ देण्यात आली. त्याचबरोबर वाढीव मुदतीतही बांधकाम पूर्ण न झाल्यास मुळ अधिमूल्याच्या २५ टक्के ते ४० टक्के अधिक अधिमूल्य द्यावे लागेल अशी अट घालण्यात आली होती. त्यानंतरही अनेक बांधकामे अपूर्ण आहेत. तसेच स्थावर बाजारपेठेत कोणतीही सुधारणा झालेली नाही त्यामुळे वाढीव अधिमूल्याची अट जाचक वाटू लागली आहे. प्राधिकरणाला हयामुळे जरी आर्थिक नुकसान होणार असले तरी वांद्रे-कुर्ला संकुलाचा विकास होणेही आवश्यक आहे.

अशा परिस्थितीत अपूर्णावस्थेतील इमारती पूर्ण करण्यासाठी पूर्वी देण्यात आलेल्या मुदतवाढीनंतर तीन वर्षांची मुदतवाढ द्यावी असे प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच त्यानंतरच्या कालावधीसाठी बांधकामाच्या मुदतीवर जाचक नाही परंतु काही तरी नियंत्रण असावे यासाठी दर महिना रु.२ प्रती चौ.मी. दंड लावावा असेही प्रस्तावित करण्यात येत आहे.

त्यानुसार,बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्रमांक ९०५ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोट कलम २ चा वापर करुन व याबाबतील त्यास सहाय्यभूत होणा-या सर्व शक्तींचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीतील

परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या प्रवर्ग १ व ३ मधील ज्या भाडेपट्टादारांनी दिनांक ३१-१२-२००० पर्यंत बांधकाम पूर्ण केले आहे त्यांचेकडून ठराव क्रमांक ७६६ मध्ये नमूद केलेला द्रव्यदंड वसूल करण्यात येऊ नये या प्रस्तावास मान्यता देत आहे व महानगर आयुक्तांना जरुर असलेली सर्व कार्यवाही करण्यास याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या प्रवर्ग १ ते ३ मधील भाडेपट्टादारांचे बांधकाम अपूर्ण आहे त्यांना शेवटची संधी म्हणून त्यांच्या बांधकाम पूर्णत्वाच्या वाढीव दिनांकानंतर जादा ३ वर्षे व प्रवर्ग चार मधील भाडेपट्टारांना त्यांच्या बांधकाम पूर्णत्वाच्या नियत दिनांकानंतर ३ वर्षे जादा मुदतवाढ द्रव्यदंड न आकारता देण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** या ठरावात नमूद केलेल्या बांधकाम पूर्णत्वाच्या जादा ३ वर्षे मुदतवाढीच्या कालावधीत बांधकाम पूर्ण न करणा-या भाडेपट्टादारांकडून बाब टिप्पणीतील परिच्छेद क्रमांक ६ मध्ये प्रस्तावित केलेला मासिक रु.२ प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ एवढा द्रव्यदंड वसूल करुन त्यांना बांधकामासाठी वाढीव मुदत देण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे व महानगर आयुक्तांना जरुर असलेली सर्व कार्यवाही करण्यास प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्रमांक १५ :** **ओशिवरे जिल्हा केंद्राच्या दुरुस्ती प्रस्तावांबददल नियोजन समितीचा अहवाल.**

प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांनी ओशिवरे जिल्हा केंद्राच्या नियोजनात सूचविलेले फेरबदल व त्या संबंधी आलेल्या सूचना व त्यावरील समितीच्या शिफारशी प्राधिकरणास सादर केल्या तसेच नियोजन प्रस्तावातील फेरबरल समितीच्या

अहवालासह शासनास मान्यतेसाठी सादर करण्यास प्राधिकरणाची मंजूरी मिळावी अशी विनंती केली.

त्यानुसार, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्रमांक १०६ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाने दिनांक २९-०८-२००० रोजी झालेल्या सभेमध्ये ठराव क्रमांक ८६५ अन्वये ओशिवरे जिल्हा केंद्रासाठी शासनाने मंजूर केलेल्या "नियोजन प्रस्तावांमध्ये" सूचविलेल्या दुरुस्ती प्रस्तावांबददूल महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदींनुसार कार्यवाही करुन प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींबददूल प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या अधिका-यांसमोर सुनावणी दिल्यानंतर, सदर सुनावणी अहवालावर विचार करुन असे ठरविण्यात येते की, प्राधिकरणाने ओशिवरे जिल्हा केंद्राच्या नियोजन प्रस्तावांसाठी संमत केलेले दुरुस्ती प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करण्यात यावे. सदर कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्रमांक १६ :** **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांस वडाळा ट्रक टर्मिनल प्रयोजनासाठी सॉल्ट पॅन लॅन्ड विभागांतील देण्यांत आलेल्या भूखंड संदर्भात जमिन महसूल भरणा करण्यांस विलंब झाल्याने व्याजाची रक्कम अदा करणे बाबत.**

जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व वडाळा ट्रक टर्मिनल प्रयोजनाचा सॉल्ट पॅन लॅन्ड येथील भूखंडावरील वाढीव जमीन महसुल भरणा करण्यास झालेल्या विलंबा बाबत रु.१४.६० कोटी इतक्या व्याजाची आकारणी केली आहे असे महानगर आयुक्त यांनी नमूद केले. जिल्हाधिकारी यांनी पाठविलेली वाढीव जमिन महसुलाची नोटीस प्राधिकरणास वेळेवर मिळालेली नव्हती.

तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडून मोठया रक्कमेची मागणी केली गेल्यामुळे त्याची तपासणी करणे आवश्यक असल्यामुळे सदरहू रक्कम भरण्यास प्राधिकरणास विलंब झालेला आहे. मागील आर्थिक वर्षात अर्थसंकल्पात सदरहू रक्कमेची तरतूद करण्यात आली नव्हती. तसेच जिल्हाधिका-यांकडून सदरहू रक्कम भरण्याकरिता सतत तगादा लावण्यात आला होता. त्यामुळे अध्यक्ष प्राधिकरण व मा.मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने सदरहू व्याजाची रक्कम जिल्हाधिकारी यांच्याकडे भरण्यात आली आहे. त्यास प्राधिकरणाने कार्योत्तर मंजूरी द्यावी अशी विनंती महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणास केली तसेच व्याजाची भरण्यात आलेली रक्कम माफ करण्याबाबत शासनास विनंती करण्यात येईल असेही नमूद केले.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्रमांक ९०७ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोट कलम (२) त्याबाबतची व त्यांत सहाय्यभूत होणा-या इतर अधिकराचा वापर करुन जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना रुपये १४,६०,९३,९९१/- व्याजापोटी अदा करण्यांत आलेल्या व रुपये ४३,५६,७३१/- भूईभाडयापोटी म्हणून रक्कमांना मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या मान्यतेस प्राधिकरण याद्वारे कार्योत्तर मंजूरी देत आहे."

**बाब क्रमांक १७ :** **दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप-हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड (MSCHFC) मुंबई यांना वांद्रे-कुर्ला संकुलात दिलेल्या भूखंड क्रमांक सी-२१ बाबत**

प्राधिकरणाने महाराष्ट्र स्टेट को-ऑप-हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन (एम.एस.सी.एच.एफ.सी.) यांना सी-२१ हा वांद्रे-कुर्ला संकुलातील भूखंड इमारत

बांधण्यासाठी काही अटींवर दिला होता तसेच बांधकाम साहित्य ठेवण्यासाठी ६०० मीटर एवढी जागाही देण्यात आली होती. ही इमारत आता पूर्ण झाली असून एम.एस.सी.एच.एफ.सी यांनी खालील दोन अटींमधून सूट मिळावी अशी विनंती केली आहे :-

(१) १० टक्के क्षेत्र शासकीय संस्थांना देण्याची अट रदद् करावी.

(२) बांधकाम साहित्य ठेवण्यासाठी वापरण्यात येणा-या जमिनीच्या भाडयातून सुट मिळावी.

वरील विनंतीचा विचार करुन प्राधिकरणाने असे ठरविले की, (१) एम.एस.सी.एच.एफ.सी. यांनी १० टक्के क्षेत्र प्रचलित बाजार भावाने दरसाल दर शेकडा १२.५ टक्के हया व्याज दराने १० वर्षाच्या मुदतीसाठी भाडे तत्वावर शासनास उपलब्ध असल्याचे कळवावे. शासनाकडून सहा महिन्यांच्या मुदतीत हा देकार स्विकारण्यात न आल्यास एम.एस.सी.एच.एफ.सी. यांना संबंधित अटीतून सुट देण्यात यावी. आणि (२) एम.एस.सी.एच.एफ.सी. यांचे १९९४-१९९८ या साडे चार वर्षाच्या कालावधीत बांधकाम बंद असल्याने बांधकाम साहित्य ठेवण्यासाठी दिलेल्या जमिनीसाठी त्या काळात लावलेल्या भाडयातून त्यांना सुट देण्यात यावी.

<u>बाब क्रमांक १८ :</u> <u>आंतरराज्य बस वाहतूक तळ</u>

महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, खाजगी वाहतूकदार महाराष्ट्रातील इतर शहरात तसेच इतर राज्यात मुंबईहून बस सेवा चालवितात. खाजगी बसेच रस्त्यावर उभ्या राहत असल्यामुळे वाहतुकीला मोठया प्रमाणावर अडथळा येतो. म्हणून हया बसेसच्या पार्किंगसाठी सुमारे दिड हेक्टर क्षेत्रफळाच्या जागेचा विकास वडाळा ट्रक टर्मिनलमध्ये करण्यात आला आहे व ते चालविण्यासाठी बॉम्बे बस वाहतूक संघ या नोंदणीकृत संस्थेला नेमण्यास कार्यकारी समितीने संमती दिली आहे. त्यांच्याकडून दरमहा रु. ४०,०००/- फी आकारण्यात येईल प्राधिकरणाच्या विधी सल्लागारांच्या मताप्रमाणे

अशी संस्था नेमण्याचा अधिकार प्राधिकरणास आहे, त्यानुसार प्राधिकरणाची मंजूरी आवश्यक आहे.

कार्यकारी समितीने घेतलेल्या वरील निर्णयास प्राधिकरणाने कार्योत्तर मंजूरी दिली व पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्रमांक ९०८ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) अन्वये कार्यकारी समितीने घेतलेल्या खालील निर्णयास प्राधिकरण कार्योत्तर मान्यता देत आहे :-

(१) वडाळा येथे आंतरराज्य बस वाहतूक तळाचा टप्पा - १ कार्यान्वीत करणे.

(२) सदर वाहन तळाची देखभाल करणे व तो चालविणे यासाठी बॉम्बे बस ओनर्स असोसिएशन या संस्थेस सुरुवातीस तीन वर्षासाठी नेमणे.

(३) सदर संस्थेकडून दरमहा रुपये ४०,०००/- एवढी रक्कम वाहन तळ चालविण्याच्या मोबदल्यात आकारणे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर वाहनतळ चालविण्यासाठी बॉम्बे बस ओनर्स असोसिएशन बरोबर योग्य तो करार करणे व त्यांच्याकडून आकारण्यात येणा-या रक्कमेत योग्य वाटेल त्याप्रमाणे वाढ करणे तसेच इतर प्रासंगिक निर्णय घेण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना प्रदान करण्यात येत आहे."

**बाब क्रमांक १९ :** **मुंबई क्रिकेट असोसिएशन यांना वांद्रे-कुर्ला संकुलात क्रिकेट ॲकॅडमीसाठी भूखंड देणेबाबत.**

मुंबई क्रिकेट असोसिएशने इनडोअर क्रिकेट ॲकॅडमी स्थापन करण्यासाठी वांद्रे-कुर्ला संकुलात जमीन मिळण्यासाठी केलेल्या विनंतीचा विचार करुन प्राधिकरणाने खालील निर्णय घेतला :-

(१) टिप्पणीत नमूद केलेली जमीन मुंबई क्रिकेट असोसिएशनला देण्याचे मान्य केले.

(२) इनडोअर क्रिकेट ॲकॅडमी म्हणून होणारा वापर शैक्षणिक प्रयोजनासाठी आहे व त्यासाठी प्राधिकरणाला आलेल्या शैक्षणिक वापराचा दर मुंबई क्रिकेट असोसिएशनला लावण्यात यावा (टिप्पणी नमूद केल्याप्रमाणे रुपये ३४०० प्रती चौ.मी असा असावा.)

(३) जमिनीचा वापर तीन प्रकारात असेल. (१) १० टक्के जमिनीवर १५ टक्के बांधकाम करता येईल व त्यासाठी वर नमूद केलेला शैक्षणिक दर लागेल. (२) त्याखेरीज २३ टक्के जमीन ही क्रिकेट असोसिएशनला त्यांच्या खुल्या वापरासाठी जसे पोहोण्याचा तलाव, टेनीस कोर्ट, संस्थेची नेट्स किंवा तत्सम वापरासाठी देण्यात येईल. हा वापर खुला असल्याने त्याचा दर नाममात्र असावा. (३) ६७ टक्के जागा सार्वजनिक शिस्तबध्द वापरासाठी खुली ठेवावयाची आहे त्यालाही नाममात्र दर लावण्यात येईल.

(४) या इनडोअर क्रिकेट ॲकॅडमीमध्ये सर्व महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी पात्र ठरविण्यात यावे. या ॲकॅडमीमध्ये फक्त मुंबईतील विद्यार्थ्याला प्रवेश मर्यादित ठेवू नये.

(५) संस्थेला दिलेली जागा आंतर शालेय व आंतर महाविद्यालयीन क्रिकेट सामन्यांसाठी खुली ठेवावयाचे बंधन राहील.

(६) वरील निर्णयाचे अधिन राहून मा.मुख्य सचिव व महानगर आयुक्त प्राधिकरण यांनी इतर बाबी अटी व शर्ती अंतिम कराव्यात व त्यास कार्यकारी समितीची मान्यता घ्यावी.

इतर विषयाबाबत झालेली चर्चा :--

मुंबईत केंद्र शासनाची मालकी असलेल्या सॉल्ट पॅन (मिठागर) जमीनीच्या ५० टक्के जमीन राज्य शासनास हस्तांतरीत करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे असे मुख्य सचिव यांनी प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या निदर्शनास आणून दिले. राज्य शासनाकडे हस्तांतरीत होणा-या सदरहू ५० टक्के जमिनीचे नियोजन नगर विकास विभाग, गृहनिर्माण विभाग, मुंबई महानगरपालिका व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी करावे. यासाठी प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी एका

समितीचे गठण करावे व या कामास चालना द्यावी यास मा.मुख्यमंत्री यांनी मान्यता दिली. तसेच जमिनीचे संरक्षणही प्राधिकरणाने करावे असे मुख्य सचिव यांनी सुचविले.

तसेच मुख्य सचिव यांनी महानगरपालिका व नगर परिषदा यांना मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी निधीची नेहमीच आवश्यकता भासते व हा निधी तातडीने उपलब्ध होऊ शकत नाही. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे असलेला निधी अधिनियमाच्या तरतूदीनुसार मुंबई महानगर प्रदेशामध्ये अनुदान/कर्जाच्या स्वरुपात वितरीत करण्यात येतो. महाराष्ट्रातील इतर महानगरपालिका/नगरपरिषदा यांनाही मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी वेगळी नागरी सुविधा निधी निर्माण करणे आवश्यक आहे असे मुख्य सचिवांनी सांगितले त्यास अध्यक्ष, प्राधिकरण यांनी संमती दर्शविली.

त्यानंतर मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

***************

**जोडपत्र**

जोडपत्र

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १०० वी बैठक

## दिनांक १७ मे, २००१.

## : ठ रा व :

"श्री. सुधाकरराव नाईक, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक १० मे,२००१ रोजी निधन झाले. श्री.नाईक, हे दिनांक १२-०३-१९७८ ते दिनांक ०४-०८-१९७८ या कालावधीत गृहनिर्माण मंत्री म्हणून सदस्य होते, तसेच दिनांक ०१-०६-१९९२ ते दिनाक १६-०७-१९९२ या कालावधीत मुख्यमंत्री व नगर विकास मंत्री या नात्याने प्राधिकरणाचे अध्यक्ष होते. या काळात श्री.नाईक यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण त्यांच्या दु:खद आणि आकस्मिक निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलेखित करीत आहे."

या ठरावाची प्रत दिवंगत श्री.नाईक यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दु:खात प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे.